# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

(विधी व न्याय विभाग अंतर्गत)

२४०२ "ए " वॉर्ड, अपना बँक बिल्डींग तळमजला, उभा मारुती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर

फोन नं.(०२३१) २६२६१४७, २६२६७५० फॅक्स: (०२३१) २६२६७५०

E-mail - dmckolhapur@gmail.com Visit : www.mahalaxmikolhapur.com

देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर


क्र.देव.वशि.जा.१८७१/२०२३ दिनांक :२६/०९/२०२३

## दरपत्रक मागणी सुचना

देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर या कार्यालयाकडे व्यवस्थेस असलेल्या श्री.करवीर निवासिनी देवस्थानकडे व इतर देवस्थानकडे अभिषेकासाठी भाविकांना धार्मिक विधी (अभिषेकाकरीता) सोवळी आवश्यक आहेत. त्यानुसार दि.१५/१०/२०२३ ते ३१/०३/२०२४ या कालावधीसाठी खाली नमुद केले वर्णनाप्रमाणे सोवळी पुरविणेत यावीत.

| क्र. | सोवळयाचे वर्णन | प्रति सोवळे दर सर्व शासकिय करासहित (रुपयामध्ये) |
|---|---|---|
| १ | ४ मीटर लांब व टेरिकॉट कापड असलेले | रुपये : |
| २ | २ मीटर लांब उपरणे टेरिकॉट कापड असलेले | रुपये : |

वरीलप्रमाणे सोवळाचे दरपत्रक सिलबंद करुन ते देवस्थान समितीचे कार्यालयात दि.०४/१०/२०२३ सायंकाळी ५.०० वाजेपूर्वी पोहोच करावे. सदर सिलबंद दरपत्रकावर विषय, दरपत्रक, दरपत्रक देणा-याचे नाव, पत्ता, संपर्क क्रमांक नमुद करावा. दरपत्रकासोबत पॅनकार्ड व जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्राची प्रत देणत यावी.

१) सदरचे दरपत्रक हे वर नमुद केले कालावधीसाठी राहतील.
२) वर नमुद केले वर्णनाप्रमाणे सोवळे पुरविणेचे आहे.
३) नमुद केलेल्या वर्णनापेक्षा वेगळे सोवळी असलेस ती स्विकारली जाणार नाहीत.
४) सोवळे पुरविणेकामी वैयक्तिक/भागिदारी/ फर्म/ कारखाना यांचे नावे असलेले पॅनकार्डची प्रत दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.
५) सोवळे पुरविणेकामी जी.एस.टी.प्रमाणपत्र दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.
६) वर नमुद केले दराव्यतिरिक्त अन्य शासकिय कर असलेस ते सर्व कर दरपत्रक देणा-यांनी संबधीत विभागास परस्पर जमा करणेचे आहेत. त्यास देवस्थान व्यवस्थापन समितीची जबाबदारी राहणार नाही.
७) दरपत्रकामध्ये नमुद केले दराप्रमाणे वरील नमुद कालावधीसाठी सोवळी पुरविणेची आहेत. कोणत्याही कारणास्तव दर वाढवून दिले जाणार नाहीत.
८) सदरचे दरपत्रक मंजुर झालेनंतर सदरची सोवळी व्यवस्थापक, श्री.करवीर निवासिनी महालक्ष्मी/ अंबाबाई मंदिर कोल्हापूर येथे स्वखर्चाने पोहच करणेचे आहेत.
९) सदरचे दरपत्रक मुदतीमध्ये प्राप्त न झालेस ते स्विकारले जाणार नाही.

सचिव
देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

प्रत : १. कार्यालयीन वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.
२. देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर मुख्य कार्यालय नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी.
३. श्री.करवीर निवासिनी महालक्ष्मी/अंबाबाई देवस्थानचे नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी.
४. श्री.केदारलिंग देवस्थान वाडी रत्नागिरी ता.पन्हाळा येथील नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी.
५. श्री.सिध्दीविनायक ओढयावरील गणपती, श्री.दत्तभिंक्षालिंग देवस्थान आझाद चौक, श्री.बिनखांबी गणेश मंदिर महाद्वार रोड, श्री.पंचमुखी मारुती देवस्थान बागल चौक, श्री.बाळूमामा देवस्थान शाहुपुरी १ ली गल्ली या स्थानिक देवस्थानकडे प्रसिध्दीसाठी.

Scanned with OKEN Scanner